**ॲक्टिव् व्हॉईस**
*(काचोळे सरांसाठी)*

तीसेक वर्षांनी तुम्हाला अचानक भेटल्यानंतर आपल्यातला अर्धशतकातला नवाबी गालिचा विरत चालला होता. गालिच्याच्या दुसऱ्या टोकाला तुम्ही उभे होतात. रुळ नाही , आता हातात काठी आली होती. तुम्ही वाकलेले नव्हताच कधी, आताही तसे दिसत नव्हता. वय वाकवतं ना थोडंपार, तेवढाच भास, बाकी तेच खादीचे कपडे आणि रेखून पाहणारी तिच करडी नजर.

तुम्ही भाषा नाही शिकवली सर, व्याकरण शिकवलं आम्हाला अन् भाषेत सोडून दिलं ॲक्टिव् - पॅसिव् कर्तरी प्रयोग. रॉयीस्ट तटस्थतेनं गांधी सांगितला. शाळाच होती शेतकऱ्यांच्या पहिल्यांदाच शिकणाऱ्या मुलांची, तर सांगायचात की ज्ञान हेच मूल्य आहे प्राथमिक अन् करूणा. स्वातंत्र्याच्या कहाण्या सांगितल्या नाहीत पण त्या दिसायच्या ऐकू यायच्याच तुमच्याभवती पार्श्वसंगीतासारख्या. तुम्ही क्षमा नाही केली कधी भिजल्या गणवेशात उशिरा शालेत आलो तेव्हा. माफक हसून कधीतरी कौतुकंही केली ती राहिली लक्षात. कालोख्या दिवसात देशातल्या, रात्रीच्या बैठकीत उजेडाचे हक्क सांगितले होतेत.

आत्ताचं वेगळं आहे सर, असं म्हटलो असतो तर म्हटला असता सगळ्याच कालात हे असंच असतं. युद्ध होतात. सामुहिक कत्तली होतात. कापली-जाळली जातात माणसं. पायाखालची भूमी अन् डोक्यावरचं आभाळ ओढून बेदखल केली  जातात. पण तरी सर, काय करावं अशा काळात ? तुम्ही निघालाच होता, तेव्हा थांबून काठी टेकवून पाठीवर हात ठेवत म्हटलात, बोलता येतं ना ? मग बोलत राहा.

आणि निघून गेलात.

© गणेश विसपुते